# वर्धा जिल्ह्यात बत्तीस ग्रामदाने–पळसगाव ग्रामदान झाले

साम्ययोग दैनिक पुरवणी

# विनोबा-वार्ता

मासिक वर्गणी १.५० न. पं.

अंक : ५६] सेवाग्राम, मंगळवार ता. १२ मे १९६४ [मूल्य ५ न. पै.

## रुक्मिणी मातेच्या कौंडिण्यपूरला विनोबा जाणार

आर्वी तालुक्यात पदयात्रेचा कार्यक्रम ठरविण्याची चर्चा चालली होती. आर्वी नंतर विनोबांचे कार्यक्रम वर्धा नदीच्या किनाऱ्यावरील गावात ठेवलेले आहेत. विनोबांना लगेच कौंडिण्यापूरची आठवण झाली. ते म्हणाले ( मला ) कौंडिण्यपूरला जाण्याची ईच्छा आहे. रुक्मिणी मातेचे ते गांव. तेथे जावून मी ग्रामदान मागणार. नंतर ते म्हणाले कौंडिण्यापूरची वेस आजच्या अमरावती शहराला लागलेली होती. महाराष्ट्राचे ते प्रख्यात शहर होते. महाराष्ट्र त्या शहरा भोवती उभा होता. आजच्या मुंबई पेक्षा मोठे ते शहर असावे. 'महाराष्ट्र मुखमंडनम्' म्हणून ते प्रसिद्ध होते. ३०-३२ मैल ते लांब पसरलेले ह ते.

## वर्धा जिल्ह्यात नवीन जोम

[ सकाळची पाच वाजेची मंगल वेला. गावातील यच्चयावत नर, नारी-बाळे, तिन्ही पिढ्या विनोबांच्या स्वागतासाठी हजर होत्या. विनोबांचे स्वागतपर भाषण करतांना तेथील तरुण गृहस्थ म्हणाले 'आम्ही आमच्या गावाचे ग्रामदान केले त्याने आमचा व आमच्या भावी पिढीचा भाग्योदय होईल.' गावचे वयोवृद्ध सरपंच श्री. गंगारामजी पाटील ह्यांनी ग्रामदानपत्र अर्पण केले. –सं ]

### ग्रामदान हा भक्तिमार्ग

फार आनंद आहे आपल्या दर्शनाने. सकाळच्या प्रहरी मोठ्या पहाटेला मंगलदर्शन आणि ग्रामदानाने स्वागत ही शुभघटना आहे. वर्धा जिल्ह्यात एक नवीन जोम येत आहे ह्याचे हे दर्शन आहे. जवळचे आगरगाव हि ग्रामदान झाले आहे. आमच्या वाटेत हे गाव नव्हते. पण विचार केला लोक प्रेमाने ग्रामदान करतात तर जावे. मला त्याचा श्रम नाही वाटला. उत्साहच होता.

नागझरी मोठे गाव ग्रामदान झाले आता बाकीची त्यामागे होणारच.

पुढे गेले त्यांचा शं धित मारग ।
चला जाऊ माग घेत आम्ही ।।

मोठ्या गावाचे मागे जाऊ या. या मार्गाने भय कोणतेच नाही. कोणीच भटकणार नाही. डोळे लावून धावत गेला तरी अडखळणार नाही; ठेचाळणार नाही. असा भक्ति मार्ग आहे. आहे. ग्रामदान हा भक्ति मार्गच आहे.

### नित्य सद्‌बुद्धि ठेवा

जमीन आपल्यासाठी आहे काय ? ती हवा पाण्या प्रमाणे सर्वासाठीच आहे. तेव्हा आपण प्रेमाने जमीन भूमिहिनांना देणार, ग्रामसभेला चाळीसावा हिस्सा देणार," व मालकी गावाची करणार, असे ग्रामदानाचे सुंदर स्वरूप आहे. गावात सर्व सेवा संघाचे व खादी ग्रामोद्योग कमिशनच्या मदतीने अंबर चरखे आणाल. त्यामुळे गावाची उन्नतीच दिवसें दिवस होणार आहे.

ह्या प्रातःकाळी तुम्ही मंगल संकल्प केला. तुमच्या गावात जो सूर्योदय होईल तो सुखाचा होईल. कोणी दुःखी दिसला तर त्याच्या दुःखात भाग घ्या. त्याने त्याचे दुःख ओसरेल. भूतदयेचा हा साधा सोपा सिद्धपंथ आहे. तुम्ही आज चांगले काम केले. अशीच चांगली कामे नित्य करीत चला. सद्‌बुद्धि आज झाली तेवढीच पुरेशी नाही. नित्य सद्‌बुद्धि ठेवा.

'नित्य नवा दिस जागृतीचा' भगवंताची भक्ति करा. त्याने ती वाढेल.

पळसगाव
६-५-६४

## जय-जगत्‌चे महत्व

आमचा संघटनावर विश्वास नाही शब्दावर आहे. आम्ही म्हणतो काम करा अगर करू नका परंतु भारताच्या प्रत्येक घरात शब्द पोहोचवा. आज मागील तेरा वर्षात तीन चार कोटी लोकांच्या मुखातून 'जय जगत' शब्द बाहेर पडला. आम्ही पाकिस्तानात गेलो, तेथेहि आम्ही 'जय जयत्' म्हणत होतो. लोकहि म्हणत होते. जर आम्ही जय हिन्द म्हटले असते तर लोकांनी ऐकले नसते. म्हणून हे समजले पाहिजे की आमच्या जवळ असा शब्द आहे की तो सर्व जगात चालू शकतो. जयहिन्द हा चांगला शब्द आहे परंतु तो शब्द हजार रुपयाच्या बरोबर आहे. जय जगत् एक लाख रुपयाबरोबर आहे. एक लाख रुपयात एक हजार रु. येऊन जातात. कर्नाटकात हा शब्द आम्हाला सुचला आणि तो आजपर्यंत ३–४ कोटी लोकापर्यंत पोहोचला. तसे तर ४५ कोटी लोक आहेत. त्या सर्वाजवळ हा शब्द कसा जावा ! साहित्याच्या द्वारे जावा तर काम कसे होईल याची चिंता करण्याचे कारण नाही. शब्दच काम करेल.

–विनोबा

## खेडी प्रेमाने व शहरे लोभाने बनली आहेत

एका कवीने म्हटले आहे की देवाने खेडी निर्माण केली आणि मनुष्याने शहर बनविले. कवीची ती भाषा आहे. त्याचा अर्थ असा होतो की खेडी बनली ती सहज प्रेमाने बनली आणि शहरे बनली पुष्कळशी लोभाने बनली. आता याचा अर्थ असा नाही की शहरांत प्रेम नसते. परंतु शहरे बनतात ती लोभामुळे. तुम्हाला माहीत आहे की, शेण पडलेले असते रस्त्यात त्यांत असंख्य किडे एकत्र होतात. केव्हा गुळ असतो, तर अनेक मुंग्या तेथे येतात. किंवा गुळावर माशा बसतात. माशांना जर विचारले की, तुम्ही एकत्र झालात तर काय तुमचे परस्परावर प्रेम आहे तर त्या म्हणतील हे आमचे एकमेकावर प्रेम नाही गुळावर प्रेम आहे. तशी मुंबईला मनुष्यें जमली मुंबईत एका मकानात हजार, हजार माणसे राहतात. कोणी गुजराती असतो, कोणी कर्नाटकी असतो, कोणी बंगाल बिहारचा असतो. ठिकठिकाणचे लोक एकत्र झालेले असतात. कशाला झालेले असतात ? पैसा मिळतो म्हणून. त्यांचा समाज नसतो. जमाव असतो. तर शहर माणसाने बनविले.

### खेड्यात समाज असतो

तुम्हाला माहीत आहे. स्टेशनावर गर्दी होते त्या लोकांचे काय एकामेकावर प्रेम असते त्यांचा आपसात काय संबंध असतो. काहीच नसतो. तेथे घोळका जमला असतो. समाज नसतो. घोळका आणि जमाव एक गोष्ट, समूह आणि समाज एक गोष्ट समाजात एक दुसऱ्यांचा संबंध असतो. असे खेड्यात प्रेमासाठी माणसे जमली. मिळून कामे करतात. एखाद्या घरात मुलगा जन्माला आला तर सगळ्यांना माहीत, सबंध गावाला समजते. आणि मेला तर सगळ्या गावचे लोक जमतात. अशा रीतीने गावाची प्रत्येक घटना माणसे आपल्या घरची समजतात. कारण ती प्रेमासाठी जमली आहेत.

### पैशाला स्थिर मूल्य नाही

पण आता काय झाले आहे ? इंग्रज आल्यावर गावातले उद्योग गेले. फक्त जमीन तेवढी राहिली. आता पैसा हवा तर काय करतात ? मिरची पेरतात. ती कशासाठी ? विक्रीसाठी. कापूस पेरायचा, तो विक्रीसाठी. उस पेरायचा तो विक्रीसाठी. जे काही पेरायचे ते विक्रीसाठी व पैसा येईल त्या आधारावर जीवन चालवतात. याचा परिणाम काय झाला ? पैसा काही खेड्यात नाही शहरात बनतो. नाशिकला छापखाना आहे. त्या छापखान्यांत पैसा बनतो. एका कागदावर एक ठप केले तर एक रुपया बनला. आणि दुसऱ्या कागदावर एक ठप केले तर शंभर रुपये बनले. एक रुपया आणि शंभर रुपये बनवण्याला सारखेच श्रम पडतात. पण तुम्हाला एक रुपयाचे धान्य पिकवायला जितके श्रम लागतील शंभर रुपयांचे धान्य पिकवायला त्याच्या शंभरपट श्रम करावे लागतात पण तरीहि ते तुम्ही करता आणि शहरात विकता. कशासाठी ? या नोटेच्या मोहासाठी. खेड्यात लोण

## विनोबांच्या पडावावर जिल्हा प्रमुखांची सभा

### स्थळ-नांदोरा (आर्वी तालुका)

ता. १४ मे रोजी दुपारी ११ ते १२ वाजेपर्यंत वर्धा जिल्ह्यातील सर्व एम्. एल्. ए., एम्. एल्. सी.; सर्व बी. डी. ओ., तालुका पंचायत समितीचे अध्यक्ष व उपाध्यक्ष, जिल्हा परिषदेचे सर्व सदस्य आणि स्टँडिग समितीचे अध्यक्ष ह्यांची सभा होणार आहे. वर्धा ते आर्वी व आर्वी ते नांदोरा बसेसची व्यवस्था राहील. पुलगावकडून येणारांनी रेल्वेने पाचेगाव स्टेशनवर उतरावे.

www.vinoba.in

